भूमीसंपादन,पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण यांच्या कार्यालयातील राजपत्रित अधिकारी व कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालांचे प्रतिवेदन व पुनर्विलोकन करण्यासंदर्भात कार्यपध्दती विहीत करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र.आरपीए २०१८/प्र.क्र.३४३/र-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०००३२
दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१९

<u>संदर्भ:</u> १) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.सीएमआर १२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा, दि.१.११.२०११
२) महसलू व वन विभाग, शासन निर्णय क्र.आरपीए-१४१५/प्र.क्र.४५/र-१, दि..२०.१२.२०१६
३) महाराष्ट्र भूमीसंपादन,पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण,नागपूर यांचे पत्र क्र. आस्था/कार्याक्र.१/२०१८/१४३, दि.२४.९.२०१८

<u>प्रस्तावना:-</u>

शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणे व जतन करणे याबाबत संदर्भ क्र.१ मधील शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाने एकत्रित सर्वसाधारण सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

"भूमीसंपादन व पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम ५१च्या तरतूदीस अनुसरुन भूमी संपादनाच्या संबंधातील विवाद तातडीने निकालात काढण्याच्या प्रयोजनार्थ सर्व महसूल विभागासाठी एक भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. सदर प्राधिकरणासाठी महसूल व वन विभागाच्या दि.१९.७.२०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार मा.पीठासीन अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून मा.पीठासीन अधिकारी यांनी दि.१३.८.२०१८ पदभार स्वीकारुन रोजी न्यायालयीन कामकाजास सुरवात केलेली आहे. तसेच महाराष्ट्र भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर या कार्यालयात एकूण १३ पदे मंजूर असून सदर पदांवर १ निबंधक व ३ कनिष्ठ लिपिकांसह १ शिपाई असे एकूण ५ कर्मचारी कार्यरत आहे. निबंधक, महाराष्ट्र भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर यांनी त्यांच्या संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये प्राधिकरणातील उपरोक्त पदांवर कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचे गोपनीय अहवालांचे प्रतिवेदन व पुनर्विलोकन कोणी करावे याबाबत पदानिहाय आदेश पारीत होण्याबाबत विनंती केली आहे.

भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर यांच्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालांचे प्रतिवेदन व पुनर्विलोकन करण्यासंदर्भात कार्यपध्दती विहीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय :-</u>

१. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक :सीएफआर-१२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा, दिनांक ०१ नोव्हेंबर २०११ मधील सर्वसाधारण सूचना यांना अबाधित ठेवून सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ठ-अ मधील परिच्छेद क्रमांक २३ मधील तरतुदींस अनुसरुन महाराष्ट्र भूमीसंपादन,पुनर्वसन व पुनर्स्थापना प्रधिकरण,नागपुर यांच्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदीत आणि पुनर्विलोकीत करण्यासाठी खालील तक्यात नमूद प्राधिकारी सक्षम असतील.

अ.क्र.	महाराष्ट्र भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरणतील संवर्ग	गोपनीय अहवाल प्रतिवेदन करण्यास सक्षम असलेले प्राधिकरी	गोपनीय अहवाल पुनर्विलोकित करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी
१	निबंधक	पीठासीन अधिकारी, महाराष्ट्र भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनस्थापना प्राधिकरण, नागपुर	सचिव/प्रधान सचिव / अप्पर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) मंत्रालय, मुबंई
२	अव्वल कारकून	निबंधक,महाराष्ट्र भूमीसंपादन पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर	पीठासीन अधिकारी, महाराष्ट्र भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपुर
३	लघुलेखक	निबंधक,महाराष्ट्र भूमीसंपादन पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर	पीठासीन अधिकारी, महाराष्ट्र भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपुर
४	लिपिक	निबंधक,महाराष्ट्र भूमीसंपादन पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर	पीठासीन अधिकारी, महाराष्ट्र भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपुर
५	वाहचालक	निबंधक,महाराष्ट्र भूमीसंपादन पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर	पीठासीन अधिकारी, महाराष्ट्र भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर

२. उपरोक्त निर्देशानुसार प्रतिवेदीत व पुनर्विलोकित करण्यात न आलेले गोपनीय अहवाल असल्यास त्या वर्षाचा / कालावधीचा गोपनीय अहवाल विचारात घेतला जाणार नाहीत.

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.सीएफआर-१२१०/प्र.क्र.४७/२०१०, तेरा, दिनांक ०१.११.२०११ अन्वये विहीत करण्यात आलेल्या इतर मार्गदर्शक सूचना व निशानिर्देशक आणि कार्यपध्दतीचे अनुपालन करण्याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.

४. हे आदेश तात्काळ प्रभावाने लागू होतील. सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्याअनौपचारीक संदर्भ क्र. ४५०/कार्या.१३/सा.प्र.वि., दिनांक ०७.०२.२०१९ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०१९०२२८१६३६१६१०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shivaji P Karwar

Digitally signed by Shivaji P Karwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0dbd15a4cda43063e726a7e4b0f366443319057727eda4431c6e339fb479ef33, cn=Shivaji P Karwar
Date: 2019.02.28 16:38:45 +05'30'

(शिवाजी पां. कारवार)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग.

प्रत :-

१) मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा.राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा.सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
४) निबंधक, महाराष्ट्र भूमी संपादन, पुनर्वसन आणि पुनस्थापना प्राधिकरण, नागपूर.
५) सामान्य प्रशासन विभाग, कार्या - १३, मंत्रालय, मुंबई.
६) विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर.
७) जिल्हाधिकारी, नागपूर.
८) उप सचिव (श्री.कुलकर्णी) ,मदत व पुनर्वसन यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
९) कार्यासन ई-३, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०) र-१ कार्यासन निवडनस्ती.